International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासींचे विद्रोह : इतिहास आणि वास्तव

परमेश्वर बालासाहेब शेळके

*Corresponding Author –* परमेश्वर बालासाहेब शेळके

DOI - 10.5281/zenodo.17662158

**प्रस्तावना :**

ऐतिहासिक ज्ञान हे वास्तवाला अनेक प्रकारे प्रभावित करत असते. व्यक्तीला यातूनच स्वतःच्या अस्तित्वाची व आपल्या हक्क व अधिकाराची ओळख घडत असते. यामुळे नव्या सामाजिक अस्मितांच्या उभारणीसाठी इतिहासाची नवी मांडणी आवश्यक ठरते यातूनच वास्तवाला बदलण्याच्या धारणा निश्चित होत असतात.

आदिवासींच्या बाबतीत स्वातंत्र्यलढ्यात त्यांचे योगदान काय? किंवा आतापर्यंतच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात आदिवासी बद्दल काय लिहिले? त्यांचा इतिहास किती लिहिला हे जाणणे महत्त्वाचे आहे. 1857 चा जो पहिला क्रांतिकारी उठाव झाला तो क्रांतिकारी मंगल पांडे हा पहिला क्रांतिकारी मानला जातो.परंतु त्याच्या अगोदरही आदिवासींमध्ये संथाळ उठाव झाला तो तिलका मांझीच्या नेतृत्वाखाली झाला. तसाच तंट्या भीलचा. असे कितीतरी उठाव या ब्रिटिश सत्तेच्या विरोधात झाले.पण ते उजेडात आलेच नाहीत. आले ते दोन-चार ओळी पुरतेच. एक नायजेरियन लेखक चिनूआ अचेबे त्याचे लोकप्रिय कोटेशन आहे, "जब तक शेरो के अपने इतिहासकार नही होंगे, शिकार का इतिहास हमेशा शिकारी का महिमामंडण करेगा. " याचा अर्थ कमजोर पराजित लोकांना आपला पराक्रम सांगण्यासाठी कोणी नसतो तेव्हा इतिहास शक्तिशाली लोकांचा लिहिला जातो. आणि जोपर्यंत दलित, आदिवासी, उपेक्षित यांचा इतिहास लिहिण्यासाठी आपले इतिहासकार नसतील तर कोण आपला इतिहास लिहणार?ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध जवळपास 150 पेक्षा जास्त आदिवासीचे उठाव पूर्ण भारतभर झाले परंतु इतिहासलेखन झाले नाही.का? असा प्रश्न पडतो.

उठाव करणाऱ्या आदिवासी नायका मध्ये धार्मिक श्रद्धाही आपल्याला पाहायला मिळतात. ज्या माझ्या वाचनात आल्या त्या म्हणजे सुमित सरकारांच्या आधुनिक भारत या पुस्तकात एक ते दोन पेजवर आदिवासींचे उल्लेख आढळतात पण ते स्वातंत्र्यलढ्यात आदिवासींचे उल्लेख करत नाहीत. ते काही मिथकीय कल्पना,आदिवासींमध्ये चमत्कारिक शक्ती असल्याचे दावे करतात.एवढ्या चमत्कारी मुद्द्यांपर्यंतच सुमित सरकारने आपल्या पुस्तकात आदिवासींचा उल्लेख केलेला आढळतो.

मिथकीय शक्तींचा विचार करतो तेव्हा महात्मा फुले यांनी आपल्या इतिहास लेखनात समाज एकीकरणासाठी बळीराजा या मिथकाचा उपयोग केला होता. बळी हा शेतकऱ्यांचा आदर्श राजा होता.

शेतकऱ्यांच्या कल्याणाची काळजी तो करत असे. आणि त्याच्या राज्यात शेतकरी सुखी होते म्हणून शेतकरी नेहमी बळींचे राज्य येवो असे आजही शेतकऱ्यांना वाटते. तसेच आदिवासी ब्रिटिशाविरुद्ध लढताना आपल्या नायकाला किंवा नायक स्वतःला त्या मिथकात पाहत असतील. सर्वच समाजात अशा धार्मिक श्रद्धा असतात ज्या भविष्यातील ध्येयदृष्टी मांडत असतात. त्या प्राचीन काळातील कथांवर आधारित किंवा पुराणकथा असतात. समाज एकवटण्यामध्ये त्या महत्त्वाच्या भूमिका निभवतात व त्यातून नवचेतना, ऊर्जा,निर्माण करण्यासाठी कामी येतात. वर्तमानकाळाच्या दृष्टीने त्या कथेला एक विशिष्ट असा अर्थ आणि महत्त्व असते.याचे कारण असे की या कथेच्या साह्याने ती कथा सांगणारा माणूस एक विशिष्ट विचार समाजापर्यंत पोहोचवत असतो यावेळेस ती कथा खरी की खोटी या गोष्टीचे तेवढे महत्व नसते.

आदिवासींचे ब्रिटिशाविरुद्ध खूप उठाव झाले. त्यात पहाडिया विद्रोह, चुआर, कोल, भील, खाशी, कुका,खोंड, संथाल, मुंडा इत्यादी अनेक क्रांतिकारी उठाव ब्रिटिशांच्या विरोधात लढले गेले. परंतु आजही या विद्रोहांची इतिहासाच्या लेखनात खूप कमी माहिति दिली गेली आहे. आदिवासींच्या बाबतीत न्यूजवरील बातम्यांमध्ये प्राईम टाईम वर कधी डिबेट होत नाहीत. त्यांच्या प्रश्नावर कधी चर्चा होत नाही. का होत नाही याचाही शोध घ्यायला हवा. इतिहास लेखनामध्ये भेदभाव केला जातो. आदिवासींच्या आयडेंटिटी पुसली जात आहे.आदिवासींच्या जागावर गैर आदिवासींची नियुक्ती केली जाते.जनगणनेची मागणी होते त्यात त्यांचा धर्मकोड नाही.धर्मांतर मुद्दे असतील, डिलीस्टिंग चा प्रश्न असेल.किंवा आदिवासी वनहक्क कायदा 1996 ला लागू झाला.आदिवासी क्षेत्रात अनुसूचित क्षेत्रात ग्रामसभांना विशेष अधिकार देतो. त्याची अंमलबजावणी व्हायलाही वेळ लागतो. इतिहासाच्या संशोधनातून आदिवासी लढ्यांचे त्यांच्या अस्तित्वाचे, स्वत्वाचे व समस्यांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. आदिवासींचा निसर्गाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.
2. मिथकीय धारणांचा अभ्यास करणे.
3. आदिवासींच्या हक्क व अधिकाराचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहीतके :**

1. आदिवासींचे निसर्गाशी घानिष्ठ संबंध आहेत ते निसर्गाचे पूजक आहेत.
2. आदिवासी मध्ये मिथकीय धारणा प्रचलित होती.
3. आदिवासींच्या हक्क, अधिकारांचे,संस्कृतीचे संरक्षण,इत्यादी च्या बाबतीत अनेक संविधानिक कायदे,तरतुदी आहेत.

**संशोधन व तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, पुस्तके, लेख,मासिके व इंटरनेटवरील विकिपीडियाचा आधार घेण्यात आलेला आहे.सदर संकलित माहितीच्या आधारे प्रस्तुत शोधणेबंधाचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**इतिहास आणि मिथकीय श्रद्धा :**

अनेक इतिहासकारांनी ब्रिटिशाविरुद्धचा 1857 चा पहिला उठाव हा मंगल पांडेच्या

नेतृत्वाखाली झालेला उल्लेख केला आहे. परंतु तुम्हाला आश्चर्य वाटेल की 1771 मध्ये ब्रिटिशाविरुद्ध पहिला उठाव तिलका मांझीने केला होता. 1855 मध्ये सिदधु आणि कानू यांनी नेतृत्व केलेले हुलबंड हे देखील 1857 च्या उठावापूर्वीचे आहे. याचे भरपूर पुरावे उपलब्ध असताना देखील भारतीय इतिहासकारांनी या बंडाबद्दल एक शब्दही लिहिला नाही. संथालांनी आपल्या संस्कृती व परंपराची छेड करणाऱ्याविरुद्ध, जमिनी बळकवणाऱ्याविरुद्ध बंड केले आणि स्वायत्ततेची मागणी केली. 30 जून 1855 साहेबगंज जिल्ह्यातील भागलपूर, बिहार आदिवासींनी शिधो आणि कान्हू यांच्या नेतृत्वाखाली 400 गावांमधील सुमारे चाळीस हजार आदिवासींनी इंग्रजांना महसूल देण्यास नकार दिला. त्यांनी घोषणा केली इंग्रजांना हाकलून लावण्याची वेळ आली आहे. त्यांनी करो या मरो ची घोषणा दिली. 'अंग्रेज हमारी माटी छोडो' अशा घोषणाही दिल्या.

सिद्धू, कान्हू, चांद, भैरव आणि त्यांच्या बहिणी फुलो आणि झनो यांच्यासह 20,000 हुन अधिक संथालांनी त्यांची जमीन, जंगल, पाणी याचे रक्षण करताना आपल्या प्राणाची आहुती दिली.

संथाल परंपरेनुसार सिद्धू आणि कान्होला देवाचे दूत मानले जाते. असे म्हटले जाते की, त्यांना देवदूतांनी मार्गदर्शन केले आणि उठावाची प्रेरणा दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली संथाळ लोकांनी ब्रिटिशाविरुद्ध युद्ध केले आणि शौर्याचे दर्शन घडविले.आज हे दोघे संथाल लोकांमध्ये प्रेरणास्थान आहेत.

त्यात सर्वात लोकप्रिय जबडा पहाडिया उर्फ तिलका मांझी आहे. 1778 मध्ये डोंगराळ जमातीच्या सरदारासह त्याने रामगड छावणीतून ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासक ऑगस्टस क्लीव्हलँड याची हत्या केली होती.नंतर इंग्रजांनी आयरकूटच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने आदिवासींना ठार मारले व जबराला अटक केली. असे म्हटले जाते की इंग्रजांनी तिलका मांझीला चार घोड्याला बांधून भागलपुर पर्यंत ओढत आणले होते, तरीही तो जिवंत होता. त्याचे शरीर रक्ताने माखलेले होते. आणि डोळे रक्तासारखे लाल होते. ते इंग्रजांच्या मनात भीती निर्माण करू शकत होते. 13 जानेवारी 1785 ला त्याला फाशी दिली. नंतर हजारो आदिवासीनी पाहाडियाच्या पावलावर पाऊल ठेऊन 'हँसी हँसी चढबो फांसी'हे गाणे गायले. ते आजही आपल्याला पहिल्या बंडाची आठवण करून देते.

तंट्या भिल हे महान क्रांतिकारकापैकी एक होते, ज्यांनी बारा वर्षे ब्रिटिश राजवटीविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला. आणि परकीय राजवट उलथळून टाकली.त्यांच्या अदम्य धैर्याने आणि उत्कटतेने जनतेने त्यांचे मन जिंकले होते. तो ब्रिटिश सरकारच्या तिजोरी लुटून ती संपत्ती गोरगरिबांमध्ये वाटत म्हणून तो गरिबांचा मसीहा होता. 10 नोव्हेंबर 1889 रोजी न्यूयॉर्क टाइम्सच्या अंकात टंट्या भीलच्या अटकेची बातमी ठळकपणे प्रकाशित झाली होती. या बातमीत त्याचे 'भारताचा रॉबिनहूड 'असे वर्णन करण्यात आले आहे. त्याच्या मृत्यूनंतर त्याला ज्या ठिकाणी फेकून देण्यात आले त्या ठिकाणी तंट्या मामाच्या आदरार्थ क्षणभर ट्रेन थांबवली जाते.

राजस्थानातील भिल्ल आदिवासी समुदायांमध्ये रामाचा मौखिक इतिहास सतत विकसित जाणारा गतिमान आहे तर दुसरीकडे संथाल रावणाला खलनायक नव्हे तर बाह्य वर्चस्वाचा प्रतिकार करणारा एक महान राजा म्हणून साजरे करतात अशा भिन्न श्रद्धाही आदिवासींमध्ये आहेत.

बिरसा मुंडा हा एक दूरदर्शी आदिवासी नेता होता. जल,जंगल,जमीन या त्यांच्या हक्काबद्दल जागरूकता निर्माण करून त्यांच्या समुदायाला सक्षम

केले आणि हक्कांसाठी उभे राहण्याची प्रेरणा दिली . ब्रिटिश शासनाच्या शोषणकारी धोरणांना धैर्याने विरोध केला. त्याने आपल्या अनुयायांना आव्हान केले की, आपल्या गौरवपूर्ण परंपरेला पुनर्जीवीत करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. इंग्रजांनी त्यांच्या परंपरागत भूमीव्यवस्थेला नष्ट केले होते. तसेच जमीनदार व व्यापारी त्यांची जमीन हडपण्यासाठी त्यांचे शोषण करत.मिशनरी त्यांच्या संस्कृतीची हेटाळणी करत यातूनच बिरसाने हे आंदोलन उभे केले होते. आणि आदिवासी समुदायाच्या सामाजिक,आर्थिक उन्नतीसाठी आपले जीवन समर्पित केले. बिरसा मुंडा हे स्वतःला धरती के आबा धरतीचे पुत्र मानत. स्वतःला भगवंताचे दूत म्हणून घोषित करून, बिरसा मुंडा थोडा ख्रिश्चन थोडा वैष्णवांच्या प्रभावाखाली आलेला होता. तो स्वतःमध्ये पैगंबर असल्याचा दावाही करत असे आणि काही चमत्कारिक दावेही करत असे. समृद्ध वारसा असलेली छत्तीसगड सरकार मुंडा यांना प्रतिकार आणि सक्षमीकरणाचे प्रतीक म्हणून साजरी करते. राज्यातील आदिवासी त्यांना एकता आणि अभिमानाचे प्रतिक म्हणून पाहतात. आणि सामाजिक,आर्थिक समानता आणि सांस्कृतिक संवर्धनासाठी त्यांच्या लढ्याची प्रेरणा घेतात.

भूमकल बंड 1910 हे छत्तीसगडमधील बस्तर या प्रदेशात गुंडाधुर यांनी याचे नेतृत्व केले होते. त्यांच्या अनुयायांनी त्यांना एक मसीहा म्हणून पाहिले होते. बस्तर प्रदेशातील नैसर्गिक संपत्ती आणि सांस्कृतिक परंपराचे रक्षण करण्याच्या इच्छेने हे बंड सुरू झाले होते.

काही आदिवासींमध्ये स्वर्णयुगाची आस्था होती. आपले मुंडा राज्य व्हावे असे बिरसा मुंडालाही वाटत होते. धर्मराज्य स्थापित करण्यासाठी गुजरात मधील नायकडा या आदिवासी जातीने पोलीस स्टेशनवर आक्रमण केले,तसेच कसार मध्ये 1882 ला सांबुदान नावाच्या एका जादूगाराचे नेतृत्वाखाली काही आदिवासी नागांनी इंग्रजा विरुद्ध आक्रमण केले.त्याचा असा दावा होता की आपल्या जादुई शक्तीने आपल्या अनुयायांना ताकत बहाल करून असे बनविले आहे की इंग्रजांच्या बंदुकीच्या गोळ्यांचा काहीही असर त्यांच्यावर होणार नाही.

इ.स. 1900 मध्ये कोरा मलय्या नावाच्या कोंडा डोराने असा दावा केला की त्याच्यात एका देवाने संचार केला आहे. त्याने स्वतःभोवती चार ते पाच हजार लोकांना जमा करून तो स्वतःला पांडवाच्या पाच भावांपैकी एका भावाचा अवतार आहे.आणि त्याचा अबोध मुलगा कृष्णाचा अवतार आहे. तो म्हणतो इंग्रजांना हाकलून लावून देशात स्वतःचे राज्य करेल. असे करण्यासाठी सहकाऱ्यांच्या हातातील वेळच्या काट्या बंदुकी बनतील आणि इंग्रजांची शस्त्र पाणी. कोंडा डोरा ही ओडिशाची अनुसूचित जमात आहे त्यांच्या श्रद्धेनुसार ते स्वतःला महान पौराणिक नायक पांडवांचे वंशज म्हणून ओळखतात आणि स्वतःला पांडव राजू किंवा पांडव डोरा असे म्हणणे प्रतिष्ठित समजतात.

1886 ला असाच एक आदिवासी विद्युत झाला ते स्वतःला राम-दंडू (रामाची सेना) मानत.

अशा प्रकारचे अनेक,मोठ्या प्रमाणात उठाव इंग्रजाविरुद्ध व जमीनदार, सावकाराविरुद्ध झालेले आहेत. सुमित सरकार यांच्या पुस्तकात या दोन-चार मिथकीय, चमत्कारीक आंदोलना व्यतिरिक्त दुसरा कोणताही आदिवासी विद्रोह आंदोलनाचा उल्लेख नाही. एस चंद यांचे आधुनिक भारताचे पुस्तक बेलेकर आणि ग्रोवर यांनी अनुवादित केलेले आहे याही पुस्तकात आदिवासी उठावाबद्दल फक्त चार ओळीत माहिती आहे.

**वन कानून :**

आदिवासींचे जंगलाशी घनिष्ठ नाते होते.ते निसर्गपूजक असल्याने त्यांच्यासोबत जोडलेले होते.वनकानून लागू झाल्यानंतर त्याचा असर त्यांच्यावर खूप मोठ्या प्रमाणावर पडला. इंग्रजांनी आपले नियंत्रण जंगलावर स्थापन केले. त्यांनी जंगलाना आपली राज्याची संपत्ती घोषित केली.काही आरक्षित जंगलावर आदिवासींना शिकार करण्यास, फळे गोळा करण्यास, शेती करण्यास मज्जाव केला. बंधने घातली. अशी बंधने घातल्यानंतर ते जिवंत कशी राहतील? मजबुरीने त्यांना जंगले सोडावी लागली.ते दुसरीकडे जात.जेव्हा जेव्हा इंग्रजांना स्वस्त मजुराची गरज भासे तेव्हा आदिवासींना जमिनीचे छोटे छोटे तुकडे दिले जात. आणि इंग्रज त्यांचा फायदा घेत. अशा ब्रिटिश कायद्याविरुद्ध आदिवासींनी विरोध केला.19 व्या शतकात आदिवासींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. जंगलात व्यापारी जमीन खरेदीसाठी, कर्ज देण्यासाठी तसेच मजूर मिळविण्यासाठी येऊ लागले. व्यापारी आदिवासी रेशीमकृमी पाळायला लावीत.रेशीम करण्यासाठी आदिवासींना कर्ज देत.आदिवासी कडून तीन चार रुपयांना रेशीम घेऊन ते बाहेर पाच पट मुनाफा कमवत. यामुळे आदिवासींना व्यापाऱ्यांची चीड येऊ लागली.

चहाच्या मळ्यात व कोळशाच्या खाणीत ठेकेदारामार्फत आदिवासी काम करत असत. तेही कमी पैशावर त्यांना राबवून घेतले जात. या अशा प्रकारचे शोषण आदिवासींचे होत. ते या ब्रिटिश धोरणामुळे. यामुळे ब्रिटिशाविरोधात मोठ्या प्रमाणात विद्रोह झाले.

पेसा ऍक्ट 1996 हा भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचित येणाऱ्या भागांमध्ये म्हणजे अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामसभांना विशेष अधिकार देतो. याचा मुख्य उद्देश म्हणजे या क्षेत्रामधील आदिवासी समुदायांना त्यांच्या पारंपारिक स्वातंत्र्याचा, हक्क, अधिकार आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर नियंत्रण मिळवून देणे तसेच त्यांचे शोषण थांबवणे आहे. २४ डिसेंबर 1996 ला मंजूर झाला मात्र त्याची अंमलबजावणी वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने झाली.देशातील अनुसूचित जमातीसाठी त्याची अंमलबजावणी हे एक मोठे आव्हान आहे.

भारत स्वातंत्र्यानंतर ही अनेक आदिवासी चळवळी झाल्या. झारखंड चळवळ, नक्षलवादी चळवळ, बोडो चळवळ इत्यादी ब्रिटिशांनंतरही त्यांचे प्रश्न तेच होते.

**निष्कर्ष :**

- भारतातील आदिवासींना मोठ्या प्रमाणात समस्या आहेत. संविधानिक संरक्षणअसताना देखील, विकासाचे कार्यक्रम आहेत तरीदेखील आदिवासींचे सामाजिक, आर्थिक स्थिती हालाखीची आहे शिक्षण आणि जमीन हक्कांसाठी आजदेखील संघर्ष करावा लागत आहे.
- विकासाच्या वेगवेगळ्या प्रकल्पाच्या नावाखाली खोदकाम, जंगलतोडीमुळे,जंगल हस्तांतरामुळे अनेक आदिवासी समुदायांचे विस्थापन झाले आहे.ज्यामुळे त्यांची सांस्कृतिक वारसा आणि ओळख धोक्यात आली आहे.
- सरकारच्या वेगवेगळ्या सुविधा असताना देखील त्या आदिवासीपर्यंत पोहोचत नाहीत. त्यांच्यात गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसते शेती आणि जंगलावरील पारंपारिक उपजीविकावर अवलंबून राहावे लागते.

- एनजीओ सारख्या संस्थांनी आदिवासींच्या हक्कांसाठी लढले पाहिजे. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- सरकार आदिवासीना वनवाशी म्हणून त्यांचे हिंदूकरण करत आहे त्यांचा संबंध हिंदू दैवतासी जोडला जात आहे.ते आदिवासी आहेत जो हक्क त्यांचा आहे तो त्यांना मिळाला पाहिजे.
- आदिवासी इतिहास लेखणाला चालना मिळाली पाहिजे.

एकंदरीत आदिवासींना भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत त्या दूर करण्यासाठी एक संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे.जो त्यांच्या पारंपारिक संस्कृती व आधुनिक विकासाच्या फायद्यासह त्यांचा हक्क आणि अधिकार अबाधित ठेवेल.

**संदर्भ:**

1. सुमित सरकार-आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.
2. संपादक हरी नरके- महात्मा फुले: शोधाच्या नव्या वाटा. प्रकाशन- शासकीय मुद्रांनालय मुंबई. यातील बळीराजा हा अशोक चौसाळकराचा लेख.
3. जितेंद्र मीना राष्ट्रानिर्माण मे आदिवासी, प्रकाशन नई दिल्ली
4. बाबा भांड -तंट्या
5. दिनेश मालवीय 2009, मध्यप्रदेश कि झाँकी तात्या भिल' द इंडियन रॉबिनहूड '
6. विकिपीडिया सिधो कान्हू, इंटरनेट.
7. विकिपीडिया कोंडा दोरा.
8. विकिपीडिया संथाल रेवोल्ट बाय तिलका मांझी.
9. शीतल कंकारयांचा लेख - आदिवासी.द्रष्टिकोन मिथक आणि मौखिक परंपरा.
10. स्वेताक पॅड - आदिवासिंच्या शौर्याची कहाणी.
11. NCERT इतिहास.हमारे अतीत.
12. बेल्हेकर, ग्रोव्हर आधुनिक भारताचा इतिहास.रामनगर नवी दिल्ली.